निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
१४ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### जमीन मोजणीत खोडा; त्रासाला कंटाळून थेट तहसील कार्यालयात एकाच कुटुंबातील चौघांचा डिझेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** जिल्ह्यातील केज तहसील कार्यालयात एका कुटुंबाने महसूल अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच पोलीस प्रशासनाने प्रतिबंध केल्याने मोठा अनर्थ टळला. केज न्यायालयाच्या आदेशानुसार जमिनीची मोजणी करून सीमांकन दाखविण्याचे तहसीलदारांचे आदेश असतानाही मंडळ अधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कर्मचाऱ्याला सहकार्य न केल्याने लांडगे कुटुंबातील चौघांनी काल केज तहसील कार्यालयाच्या दारातच अंगावर डिझेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. केज-बीड राष्ट्रीय महामार्गालगतच्या गायरान जमिनीतील वडिलोपार्जित जमीन लांडगे कुटुंबाकडे वहिवाट आहे. त्यांना या जमिनीचा ताबा मिळालेला नाही. जमिनीची मोजणी करून सीमांकन करून देण्यासाठी तहसीलदारांनी ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व भूमी अभिलेख कार्यालयाचे मोजणी कर्मचाऱ्यांना १२ जानेवारी रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर हजर राहून कार्यवाही करीत अहवाल तहसील कार्यालयाला पाठविण्याचे आदेश दिले होते, परंतु मंडळ अधिकाऱ्यांनी मोजणी करताना सहकार्य केले नसल्याने लांडगे कुटुंबातील चार जणांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

### 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा' उपक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५-२६ या राज्यव्यापी उपक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली आहे.

या उपक्रमासाठीची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया आता १६ जानेवारी २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर यांच्यामार्फत घेण्यात येणारे परीक्षापूर्व १५ दिवसांचे ऑनलाईन संविधान प्रशिक्षण १८ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे उपाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, यामध्ये इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. संपूर्ण उपक्रम पूर्णतः ऑनलाईन स्वरूपात राबविण्यात येणार आहे. सुधारित वेळापत्रकाची नोंद सर्व संबंधित शैक्षणिक संस्था, विद्यार्थी तसेच जिल्हा प्रतिनिधींनी घ्यावी असे अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे उपाध्यक्ष यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीस मतदान; उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक करण्यात आल्याचा शासन निर्णय उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, शैक्षणिक तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. या शासन निर्णयानुसार निवडणूक क्षेत्रात तसेच क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या सर्व कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी देण्यात यावी, असे आदेश आस्थापनांना देण्यात आले आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल, निवासस्थाने, आयटी कंपन्या, मॉल्स, शॉपिंग सेंटर्स, किरकोळ विक्रेते आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.

अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास किमान तीन तासांची विशेष सशुल्क सवलत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात सूचित करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

## नाशिकमध्ये निवडणुकीला गालबोट, 'आप'च्या उमेदवारावर रोखली थेट बंदूक

### जेलमधून निवडणूक लढवणाऱ्या प्रकाश लोंढेंचा कार्यकर्ता असल्याचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/ प्रतिनिधी/** नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच, प्रभाग क्रमांक ११ मध्ये घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. नाशिकच्या सातपूर परिसरात आम आदमी पक्षाचे उमेदवार समाधान आहेर यांच्यावर प्रचारादरम्यान थेट बंदूक ताणून धमकी देण्यात आल्याची गंभीर घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समाधान आहेर हे आपल्या कार्यकर्त्यांसह प्रचारासाठी फिरत असताना एका तरुणाने अचानक त्यांच्यासमोर बंदूक काढून प्रचाराला फिरायचे नाही अशी धमकी दिली. या प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेनंतर परिसरातील नागरिक आणि कार्यकर्त्यांनी तत्काळ हस्तक्षेप करत बंदूक ताणणाऱ्या तरुणाला पकडले.

**व्हिडिओ व्हायरल, नाशिकमध्ये खळबळ :** या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या मोबाईलमध्ये कैद केला असून तो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये बंदूक दाखवून धमकावल्याचा प्रकार दिसत असल्याचा दावा आपकडून करण्यात आला आहे. दरम्यान, निवडणुकीच्या काळात उमेदवारांवर अशा प्रकारे थेट शस्त्राने धमकी देण्याची घटना अत्यंत गंभीर मानली जात असून, या प्रकारामुळे नाशिकमधील निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागल्याचे पाहायला मिळत आहे. या प्रकरणात पुढे काय कारवाई होणार? याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.



#### 'तो' प्रकाश लोंढेंचा कार्यकर्ता; आपचा आरोप

संतप्त जमावाने त्याला चोप देत नंतर पोलिसांच्या ताब्यात दिले. घटनेची माहिती मिळताच सातपूर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणात आम आदमी पक्षाने गंभीर आरोप केला आहे. बंदूक ताणणारा युवक हा जेलमधून निवडणूक लढवत असलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांचा कार्यकर्ता असल्याचा दावा आपकडून करण्यात आला आहे.

**नाशिक महापालिका निवडणुकीत सलीम कुत्ता प्रकरणाला पुन्हा उजाळा :** दरम्यान, नाशिक महापालिका निवडणुकीत आरोप-प्रत्यारोप आणि टीका-टिप्पणीला जोर चढला असून त्यातच प्रभाग क्रमांक २९ मधून अपक्ष निवडणूक लढवणारे भाजप बंडखोर उमेदवार मुकेश शहाणे यांनी काल सोमवारी (दि. १२) भव्य शक्तीप्रदर्शन रॅली काढली. या रॅलीचा समारोप त्यांनी मुंबई बॉम्बस्फोटातील मृतांना मेणबत्ती प्रज्वलित करून श्रद्धांजली अर्पण करत केला. प्रभाग २५ आणि २९ मधील निवडणूक सध्या विशेष गाजत असून, माजी आमदार सुधाकर बडगुजर यांचे पुत्र दीपक बडगुजर यांनी प्रभाग २५ मधून माघार घेत थेट प्रभाग २९ मधून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यामुळे भाजपचे माजी नगरसेवक मुकेश शहाणे यांना अपक्ष म्हणून मैदानात उतरावे लागले आहे. सुधाकर बडगुजर यांचा मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सलीम कुत्ता याच्यासोबत नाचतानाचा व्हिडिओ समोर आल्यानंतर मोठी खळबळ उडाली होती आणि हा मुद्दा विधिमंडळातही गाजला होता. या प्रकरणी चौकशी झाल्यानंतर बडगुजर यांनी आपण अनावधानाने तिथे गेलो होतो, असे स्पष्टीकरण यापूर्वीच दिले आहे. मात्र, हाच मुद्दा पुन्हा पुढे करत मुकेश शहाणे यांनी आपल्या रॅलीतून सलीम कुत्ता प्रकरणाला उजाळा देण्याचा प्रयत्न केल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. हजारो मेणबत्त्यांच्या प्रकाशात श्रद्धांजली अर्पण करत त्यांनी अप्रत्यक्षपणे प्रतिस्पर्ध्यांवर निशाणा साधल्याने नाशिकच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.




## मुलाच्या मृत्यूनंतर सासऱ्यांनीच दिली सुनेची सुपारी, अपघाताचं नाटक

### गोंदियातील धक्कादायक घटना

**आत्ताच एक्सप्रेस**

**गोंदिया/ प्रतिनिधी/** गोंदियामधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. विम्याच्या रकमेसाठी सुपारी देऊन सुनेला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. सून दुचाकीने जात असताना चारचाकी वाहनाने धडक दिली. तपासादरम्यान सासऱ्यानेच जीवे मारण्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले आहे. एलआयसीचे पैसे व जमीनीसाठी त्यांनी हा कट रचल्याचं समोर आलं आहे. एका आरोपीला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. तर हा संपूर्ण प्रकार गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातील गिधाडी येथे घडला आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

मुलाच्या मृत्यूनंतर सुनेला मिळणारे एलआयसीचे पैसे व जमीनीचा हक्क तिला मिळू नये या उद्देशाने सासर्यानेच दोन जणांना सुपारी देऊन सुनेला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना गोरेगाव पोलिसांनी केलेल्या तपासातून उघडकीस आली. चुडामन कटरे रा. गिधाडी ता. गोरेगाव असे आरोपी सासर्याचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून त्याचे नाव गुप्त ठेवण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार महिला फिर्यादी अश्विनी कटरे ह्या आपल्या वडीलांसह गोरेगाववरून चिल्हाटी मार्गे स्वगावी गिधाडी येथे दुचाकीने जात असताना घोटी येथील नाल्याजवळ एका निळ्या रंगाच्या चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

या घटनेमध्ये त्या जखमी झाल्या. याप्रकरणी त्यांच्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. दरम्यान, सदर गुन्हाच्या तपासामध्ये तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अश्विनीचा पती उमेश कटरे यांच्या मृत्यूपश्चात मिळणारे एलआयसीचे ६० लाख रुपये व जमीन तिला मिळू नये. या उद्देशाने तिचा सासरा आरोपी चुडामन कटरे याने सदर गुन्ह्यातील आरोपी यांना तिला जीवे मारण्यासाठी ३ लाख रुपयाची सुपारी देऊन अपघात घडवून आणल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, गोरेगाव पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला अटक केली असून गुह्यातील इतर आरोपी फरार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. या घटनेनं संताप व्यक्त होत आहे.

#### कधी घडली घटना?

मुलाच्या विम्याची रक्कम व जमीन सुनेला मिळू नये यासाठी सासऱ्याने आपल्या सुनेचा अपघात घडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम गिधाडी येथील हे प्रकरण असून १९ नोव्हेंबर रोजी २०२५ रोजी हा अपघात घडविण्यात आला होता. प्रकरणाच्या तपासादरम्यान तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीदारांच्या आधारे चुडामन कटरे याने इतर आरोपींना तीन लाख रुपयांची सुपारी देऊन हा अपघात घडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात पोलिसांनी गुन्ह्यात कलम १०९ व ६१ (२) बीएनएस वाढवली असून, एक आरोपी अटकेत आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे

## संक्रांतीआधीच पैसे जमा झाले; आचारसंहितेच्या कात्रीतून सुटका

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** राज्यातील लाडक्या बहिणींना यंदाच्या महिन्यात संक्रांत सणाच्या पार्श्वभूमीवर १५०० रुपये बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर नियमित योजनेचा लाभ देण्यास परवानगी दिल्यानंतर आजपासून राज्यातील कोट्यवधी लाडक्या बहिणींना या योजनेचे पैसे मिळण्यास सुरुवात झाली असून सकाळपासूनच मोबाईलवर मेसेज आले आहेत. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; परंतु जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने मज्जाव केला आहे. त्यानंतर, डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता बँक खात्यात जमा झाला आहे.

लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीची मोठी भेट देण्यासाठी १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे तीन हजार जमा होणार, अशा आशयाच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी लाडकी बहिण योजनेसंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे, असे राज्य निवडणूक आयोगाने मुख्य सचिवांना कळविले होते.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचार संहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशातील तरतुदींनुसार निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेली विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे, असे मुख्य सचिवांनी आपल्या अहवालात कळविले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, या योजनेचा नियमित लाभ देता येईल; परंतु अग्रिम स्वरुपात लाभ देता येणार नाही; तसेच नवीन लाभार्थीदेखील निवडता यणार नाहीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले. त्यामुळे, लाडक्या बहिणींना ३००० ऐवजी १५०० रुपये देण्यास परवानगी मिळताच, मतदानाच्या दोन दिवस अगोदर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात आजपासून १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

#### १५ जानेवारीला मतदान

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आहे. तर, महायुतीतील दोन घटकपक्षांच्या उमेदवारांकडून त्यांच्या सोशल मिडीया अकाऊंटवरून येत्या १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात तीन हजार रुपये जमा होणार असल्याचा दावा केला जात होता. सरकारकडून मकरसंक्रातींच्या दिवशी निधी वितरित करण्यात आला तर निवडणुकीच्या आचारसंहितेचा हा भंग नाही का असा सवाल विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला. त्यामुळे, आदर्श आचारसंहितेच्या कात्रित अडकलेल्या लाडक्या बहिणींची सुटका झाली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार आणि सामाजिक क्रांतीचा इतिहास

१४ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक इतिहासात केवळ एक तारीख नसून तो स्वाभिमान, संघर्ष आणि समतेच्या मूल्यांचा विजय साजरा करणारा क्षण आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मराठवाडा विद्यापीठाला '

हे नाव देण्यात आलेला हा दिवस म्हणजे वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या दीर्घ लढ्याचे फलित आहे. हा नामविस्तार केवळ एका संस्थेला दिलेले नाव नसून तो भारतीय लोकशाहीतील सामाजिक न्यायाच्या मूल्यांना शैक्षणिक क्षेत्रात मिळालेली औपचारिक मान्यता आहे. मराठवाड्यासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात बाबासाहेबांचे नाव असलेले विद्यापीठ असणे म्हणजे येथील लाखो लोकांच्या आशा, आकांक्षा आणि आत्मसन्मानाला एक बौद्धिक अधिष्ठान मिळणे होय.

मराठवाडा हा प्रदेश दीर्घकाळ सामाजिक आणि शैक्षणिक उपेक्षेचा बळी ठरलेला आहे. निजामशाहीच्या काळात येथील समाजरचना कठोर जातीय आणि वर्गीय भेदांवर आधारित होती. शिक्षण ही काही विशिष्ट गटांची मक्तेदारी बनली होती, तर बहुसंख्य लोकांसाठी अज्ञान आणि दारिद्र्य हेच नशीब ठरले होते. स्वातंत्र्यानंतरही या प्रदेशाला औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळण्यात मोठा विलंब झाला. त्यामुळे मराठवाड्याच्या तरुण पिढ्यांना केवळ रोजगारासाठीच नव्हे तर आत्मसन्मानासाठीही संघर्ष करावा लागला. अशा परिस्थितीत १९५८ मध्ये स्थापन झालेले मराठवाडा विद्यापीठ हे या प्रदेशासाठी आशेचे केंद्र ठरले, परंतु त्याची सामाजिक दिशा आणि वैचारिक अधिष्ठान याबाबतचा प्रश्न कायम होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षण हे माणसाला केवळ नोकरी मिळवून देत नाही तर त्याला स्वतःची ओळख, अधिकारांची जाणीव आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती देते. बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक गुलामगिरी तोडण्याच्या संघर्षाचे प्रतीक होते. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने संबोधणे म्हणजे या संस्थेच्या आत्म्याला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची दिशा देणे होते. ही मागणी म्हणूनच केवळ प्रतीकात्मक नव्हती, तर ती खोलवर सामाजिक अर्थ असलेली होती.

नामांतरासाठी उभा राहिलेला लढा हा मराठवाड्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचे सामाजिक आंदोलन ठरला. या आंदोलनात विद्यार्थ्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत अनेक घटक सहभागी झाले. हा संघर्ष केवळ एका नावासाठी नव्हता, तर तो या प्रश्नासाठी होता की शैक्षणिक संस्था कोणत्या मूल्यांवर उभी राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव स्वीकारणे म्हणजे जातीय अहंकार, सांस्कृतिक वर्चस्व आणि ऐतिहासिक अन्यायाला वैचारिक आव्हान देणे होते. त्यामुळे या मागणीला तीव्र विरोधही झाला, परंतु तो विरोधच या मागणीची सामाजिक गरज अधोरेखित करणारा ठरला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर झाला आणि मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर होण्याऐवजी नामविस्तार होऊन विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाले.

हा दिवस मराठवाड्याच्या वंचित समाजासाठी केवळ आनंदाचा नव्हे, तर इतिहासाशी न्याय झाल्याचा दिवस होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या विद्यापीठाला मिळणे म्हणजे भारतीय संविधानातील समतेच्या तत्त्वांची शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रत्यक्ष अंमलबजावणी होती. या नामविस्तारामुळे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची ओळख बदलली आणि त्याचबरोबर त्याची सामाजिक भूमिका अधिक ठळक झाली. हे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' केवळ पदव्या देणारी संस्था न राहता सामाजिक जाणीव घडविणारे आणि विवेक जागविणारे केंद्र बनले.

नामविस्तारानंतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये,




संशोधनाच्या विषयांमध्ये आणि शैक्षणिक वातावरणात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व मिळू लागले. जातीय विषमता, ग्रामीण दारिद्र्य, महिला प्रश्न, आदिवासी समाजाचे प्रश्न, स्थलांतर, बेरोजगारी आणि विकासातील असमानता यांसारख्या विषयांवर येथे सखोल अभ्यास सुरू झाला. मराठवाड्याच्या वास्तवाशी जोडलेले ज्ञान येथे निर्माण होऊ लागले आणि त्यामुळे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हे केवळ स्थानिक नव्हे तर राज्य आणि देशपातळीवरील बौद्धिक चर्चांमध्येही महत्त्वाचे स्थान मिळवू लागले.

या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःचे आयुष्यच बदलले नाही तर आपल्या कुटुंबांचे आणि गावांचे भविष्यही बदलले. शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि ग्रामीण कुटुंबातील मुले-मुली उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवा, शिक्षण क्षेत्र, संशोधन आणि सामाजिक कार्यात पुढे आले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे विद्यापीठ असल्यामुळे त्यांना आत्मसन्मानाची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक तीव्रतेने होते. त्यामुळे ते केवळ यशस्वी व्यावसायिक नव्हे तर सामाजिकदृष्ट्या सजग नागरिकही बनतात.

मराठवाड्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा खोल परिणाम झाला आहे. विविध विभागांमार्फत आयोजित होणारे परिसंवाद, चर्चासत्रे, साहित्यिक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमुळे विवेकवादी आणि समतावादी विचारांचा प्रसार झाला. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि स्त्रीदास्य यांविरुद्ध बौद्धिक वातावरण निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित संशोधन आणि साहित्यनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक वास्तवाची अधिक सखोल जाणीव झाली. विद्यापीठ हे केवळ शिकवण्याचे नव्हे तर समाजाला प्रश्न विचारण्याचे केंद्र बनले.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात शिक्षणावर बाजारपेठेचा प्रभाव वाढत आहे. शिक्षण म्हणजे केवळ रोजगार मिळवण्याचे साधन अशी धारणा बळावत आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आपल्या सामाजिक बांधिलकीची आठवण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला लोकशाही मजबूत करणारे, विवेक जागवणारे आणि समाजाला अधिक समतावादी बनवणारे साधन मानले होते. त्यामुळे तंत्रज्ञान, नव्या अभ्यासक्रमांची रचना आणि संशोधनातील नवकल्पना यांसोबतच मानवी मूल्यांचे अधिष्ठानही तितकेच महत्त्वाचे असले पाहिजे.

मराठवाड्याच्या वास्तवाशी घट्ट नाते ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने भविष्यातील वाटचाल करणे गरजेचे आहे. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, महिला सक्षमीकरण आणि आदिवासी विकास यांसारख्या प्रश्नांवर येथे अधिक सखोल आणि उपयुक्त संशोधन झाले पाहिजे. या संशोधनाचा उपयोग धोरणनिर्मिती आणि स्थानिक विकासासाठी झाला तरच विद्यापीठाचे ज्ञान समाजाच्या जीवनात प्रत्यक्ष उतरू शकेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाशी जोडले होते, त्यामुळे या विद्यापीठाची प्रत्येक शैक्षणिक कृती समाजाभिमुख असणे आवश्यक आहे.

१४ जानेवारी हा दिवस म्हणून आपल्याला केवळ भूतकाळातील एका निर्णयाची आठवण करून देत नाही तर तो आपल्याला आज आणि उद्याची जबाबदारीही सांगतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव धारण करणाऱ्या विद्यापीठाने जात, वर्ग, लिंग आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन सर्वांना समान संधी देणारी संस्था बनणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. विद्यार्थ्यांना केवळ नोकरीयोग्य नव्हे तर सामाजिकदृष्ट्या जागरूक, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारे आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव असलेले नागरिक घडवणे हेच या विद्यापीठाचे खरे ध्येय असले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा मराठवाड्याच्या वंचित समाजाच्या आशेचा दीपस्तंभ आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना ज्ञान, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या संस्थेला केवळ ओळख देत नाही तर ती एक मूल्यव्यवस्था देते. समता, न्याय, विवेक आणि मानवता या मूल्यांच्या आधारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ जितके अधिक मजबूत होईल तितक्याच वेगाने मराठवाडा सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होईल. म्हणूनच १४ जानेवारी हा दिवस साजरा करताना आपण केवळ स्मरणोत्सव न करता बाबासाहेबांच्या विचारांनुसार समाज परिवर्तनासाठी नव्याने संकल्प करूया, कारण खरा नामविस्तार हा केवळ कागदावर नसून समाजाच्या जीवनात घडत असतो.

– **डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.




अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

१७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व अध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबूत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.


त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

– **अलका पाटील,** उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

# माजलगावच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार: आ. प्रकाश दादा सोळंके

राजकारणात पदे येतात आणि जातात, मात्र जनतेच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणात गेल्या चार दशकांपासून 'अजातशत्रू' व्यक्तिमत्व म्हणून ज्यांची ओळख आहे, ते म्हणजे आमदार प्रकाश दादा सोळंके. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासाचा आणि विकासकामांचा घेतलेला हा आढावा.



### ४० वर्षांची अविरत जनसेवा

प्रकाश दादा सोळंके यांनी गेल्या ४० वर्षांपासून माजलगाव मतदारसंघाच्या राजकारणात आपले वर्चस्व टिकवून ठेवले आहे. या प्रदीर्घ काळात अनेक नेते आले आणि गेले, मात्र विजय असो वा पराभव, दादांनी कधीही आपला मतदारसंघ आणि येथील जनता यांचा हात सोडला नाही. राजकारणातील चढ-उतार अत्यंत संयमाने हाताळण्याची कला त्यांना अवगत आहे. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती ते राज्याचे राज्यमंत्री आणि पाच वेळा आमदार असा त्यांचा थक्क करणारा राजकीय प्रवास राहिला आहे.

### विकासाचे प्रणेते आणि 'हरितक्रांती'चे शिल्पकार

एकेकाळी माजलगाव मतदारसंघ विकासकामांच्या बाबतीत पिछाडीवर होता. सिंचन आणि दळणवळणाच्या सोयींचा अभाव होता. मात्र, प्रकाश दादांनी आमदारकीची धुरा सांभाळताच मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात केली.

सिंचन क्रांती: दादांनी प्राधान्याने सिंचनाचे प्रश्न मार्गी लावले. विविध योजनांच्या माध्यमातून हजारो एकर जमीन ओलिताखाली आणली, ज्यामुळे शेतकरी समृद्ध झाला.दळणवळणाचे जाळे: गावोगावचे रस्ते राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांना जोडण्याचे काम त्यांनी प्रभावीपणे केले, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली.सहकार आणि उद्योग: लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेबांनी स्थापन केलेल्या साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणण्याचे मोठे कार्य दादांनी केले.

### राजकारणापलीकडचा विकास

प्रकाश दादांच्या कार्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची 'विकासवादी दृष्टी'. त्यांनी विकासकामांत कधीही राजकारण आणले नाही. विरोधकांच्या गावांतही त्यांनी भरघोस विकास निधी दिला, ज्यामुळे विरोधकांनाही त्यांच्या कामावर टीका करायला जागा उरली नाही. शेतकरी, कष्टकरी आणि शेतमजूर यांच्या प्रश्नांवर त्यांचा नेहमीच सकारात्मक प्रतिसाद असतो.

### संस्कार आणि साथ

दादांच्या या यशस्वी वाटचालीत सोळंके परिवाराची साथ अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांचे धाकटे बंधू धैर्यशील (काका) सोळंके हे 'लक्ष्मणा'प्रमाणे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. तसेच, चिरंजीव विरेंद्र दादा आणि पुतणे जयसिंह भैया यांच्या तरुण नेतृत्वाची साथ त्यांना मिळत असल्याने विकासाचा हा रथ वेगाने पुढे जात आहे.

आज प्रकाश दादा सोळंके हे राज्य विधिमंडळातील सर्वात ज्येष्ठ आमदारांपैकी एक आहेत. त्यांच्या २२ वर्षांच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी माजलगावचा विकासाचा अनुशेष भरून काढला आहे. अशा या संयमी, अभ्यासू आणि विकासवेड्या नेतृत्वास वाढदिवसानिमित्त लाख-लाख शुभेच्छा!

**- शेख हमीद, माजलगाव**
**दैनिक आत्ताच एक्सप्रेस**

# (चे)क बाऊन्स प्रकरणात तक्रारदाराला आर्थिक क्षमता सिद्ध करण्याची गरज नाही: सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणांमध्ये एक अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, तक्रारदारावर सुरुवातीलाच आपली आर्थिक क्षमता सिद्ध करण्याचे कोणतेही बंधन नाही. एकदा आरोपीने धनादेशावर स्वाक्षरी केल्याचे मान्य केले की, केवळ तक्रारदाराच्या कर्ज देण्याच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट, १८८१ च्या कलम १३९ अंतर्गत असलेल्या कायदेशीर धारणेला खोडून काढता येत नाही.या निकालाचे स्वागत करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश एस. धनावत म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय व्यावसायिक समुदायासाठी अत्यंत दिलासादायक आहे. यामुळे धनादेशाची विश्वासार्हता वाढेल आणि आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता येईल. अनेक प्रकरणांमध्ये आरोपी केवळ तक्रारदाराच्या आर्थिक क्षमतेवर प्रश्न उपस्थित करून प्रकरण लांबवण्याचा प्रयत्न करतात, त्याला या निकालामुळे आळा बसेल.

**प्रकरणाची पार्श्वभूमी :** हे प्रकरण अशोक सिंह (तक्रारदार) आणि उत्तर प्रदेशातील अन्य एका व्यक्तीमधील (आरोपी) आर्थिक व्यवहारासंबंधी होते. तक्रारदाराने आरोपीला २२ लाख रुपयांचे कर्ज दिले होते. या कर्जाच्या परतफेडीसाठी आरोपीने २२ लाख रुपयांचा धनादेश दिला.हा धनादेश बँकेत जमा केला असता, 'ड्रॉवरने पेमेंट या कारणास्तव तो परत आला. कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपीने पैसे परत न केल्याने तक्रारदाराने खटला दाखल केला. लखनऊ येथील ट्रायल कोर्टाने आणि नंतर अपिलीय न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून एक वर्षाचा तुरुंगवास आणि ३५ लाख रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली- मात्र, अलाहाबाद उच्च न्यायालयाने हा निर्णय बदलला आणि आरोपीची निर्दोष मुक्तता केली. उच्च न्यायालयाच्या मते, तक्रारदार कर्ज देण्यासाठी आवश्यक असलेली २२ लाख रुपयांची रक्कम कुठून आणली, हे सिद्ध करू शकला नाही. या निर्णयाविरोधात तक्रारदाराने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

**सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करताना अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला:**

१. **आर्थिक क्षमतेचा बोजा तक्रारदारावर नाही:** न्यायालयाने स्पष्ट केले की, चेक बाऊन्स प्रकरणात सुरुवातीलाच आपली आर्थिक क्षमता सिद्ध करण्याचा बोजा तक्रारदारावर नसतो. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट, १८८१ च्या कलम १३९ नुसार, धनादेश कायदेशीररित्या अंमलबजावणीयोग्य कर्जासाठी दिला गेला आहे, असे गृहीत धरले जाते. या धारणेला खोटे ठरवण्याची जबाबदारी आरोपीची असते.

२. **आरोपीचा बचाव तकलादू:** आरोपीने असा बचाव केला होता की त्याचा धनादेश हरवला होता, ज्याची तक्रार त्याने पोलिसांत दिली होती. मात्र, न्यायालयाने निदर्शनास आणले की धनादेश २०१० मध्ये बँकेत सादर झाला होता, तर त्याबद्दलची पोलीस तक्रार २०११ मध्ये, म्हणजेच खूप उशिरा देण्यात आली होती. त्यामुळे आरोपीचा बचाव विश्वासार्ह नाही.

३. **कंपनीला पक्षकार बनवण्याची गरज नाही:** आरोपीने असाही युक्तिवाद केला की धनादेश मेसर्स सन एंटरप्रायझेस या भागीदारी संस्थेचा होता आणि संस्थेला या प्रकरणात पक्षकार बनवले नाही. न्यायालयाने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्टच्या कलम १४१ चा संदर्भ देत म्हटले की, धनादेशावर स्वाक्षरी करणारी व्यक्ती जर संस्थेच्या कामकाजासाठी जबाबदार असेल, तर संस्थेला पक्षकार न बनवताही थेट त्या व्यक्तीवर खटला चालवला जाऊ शकतो.

४. **उच्च न्यायालयाच्या अधिकारांवर भाष्य:** न्यायालयाने म्हटले की, उच्च न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४८२ (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (इछडड) चे कलम ५२८) अंतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करताना ट्रायल कोर्ट आणि अपिलीय न्यायालयाच्या तथ्यांवरील निष्कर्षांमध्ये सहजासहजी हस्तक्षेप करायला नको होता.

**अंतिम निकाल :** सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आरोपीला निर्दोष मुक्त करणारा निर्णय रद्द केला आणि ट्रायल कोर्टाचा दोषी ठरवणारा निर्णय कायम ठेवला. तथापि, आरोपीचे वय आणि परिस्थिती लक्षात घेता, न्यायालयाने त्याच्या शिक्षेत बदल केला:एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा रद्द करण्यात आली. त्याऐवजी आरोपीला ३२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला, जो चार महिन्यांच्या आत तक्रारदाराला द्यायचा आहे.

जर आरोपीने वेळेत दंड भरला नाही, तर ट्रायल कोर्टाने दिलेली मूळ शिक्षा (एक वर्षाचा तुरुंगवास आणि ३५ लाख रुपये दंड) पुन्हा लागू होईल.

Dhannawat Law -ssociates
-dv. Mahesh S. Dhannawat
B.com, L.L.M², G.D.C. -.
Ex- Vice President
Jalna Dist. Bar -ssociation.
-dd: Shivkrupa, Kalikurti,
Dr. R P Road, Jalna (MH) 431203
Mob. 9326704647 / 02482-233581
dhannawat.maheshgmail.com

# नवनिर्वाचित भाजप नगरसेविके विरोधात तिस-या अपत्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद / प्रतिनिधी/** खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीत विजयी झालेल्या प्रभाग क्रमांक एक मधील नवनिर्वाचित भाजपच्या नगरसेविका मीना भाऊसाहेब बारगळ यांना तिसरे अपत्य असल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या पराभूत उमेदवार किरण अरूण तंबारे यांनी राज्य निवडणूक आयोग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडे पुराव्यासह केली असल्याची माहिती आज सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, खुलताबाद नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक एक मध्ये भाजपच्या मीना भाऊसाहेब बारगळ यांना सन १२ सप्टेंबर २००१ शासन निर्णय नुसार तिसरे अपत्य असून या याबाबतची जन्म तारखेची माहिती त्यांनी नामनिर्देशन अर्ज भरतांना दिलेली आहे मात्र



तिन्ही अपत्यांचे जन्म तारीख कोणती ती लिहिलेली नसल्याने ती लपविण्यात आली असल्याची माहिती किरण अरूण तंबारे यांनी दिली. सदरील तक्रारी सोबत त्यांनी तिन अपत्याचे प्रवेश निर्गम उतारा तसेच तिस-या अपत्याचा नगर परिषदेचा जन्म दाखला जोडलेला आहे. खुलताबाद नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रभाग क्रमांक १( ब) मधून भाजप तर्फे निवडून आलेल्या सदस्या मीना भाऊसाहेब बारगळ यांचे सदस्यतेव रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे.. या तक्रारीच्या गंभीरतानी दखल घेण्याची मागणी किरण अरुण तांबारे यांनी केले आहे.

विशेष म्हणजे दोन डिसेंबर रोजी खुलताबाद नगरपरिषदाच्या निवडणूक पार पडली या निवडणुकीत अनेक उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना हरी माहिती लपवण्यात आली आहे

दोनपेक्षा अधिक अपत्य असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीत उमेदवारी दाखल करताना, दोनपेक्षा जास्त अपत्य लपविण्याची शक्कल लढावल्याची चर्चा शहरात सुरू आहे मात्र

असे प्रकार आगामी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये होऊ, यासाठी उचित उपाययोजना करण्याची मागणी ही नागरिकाकडून केले जात आहे

## सिल्लोड तहसिलवर आज निषेध मोर्चा तसेच मुंडण आंदोलन

**– लातुर जिल्ह्यातील अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी लहुजी क्रांती सेना व मातंग समाज आक्रमक**

**आत्ताच एक्सप्रेस**

**सिल्लोड/ प्रतिनिधी/** लातुर जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय लातुर येथील हॉस्टेलमध्ये दि.०४ जानेवारी रोजी कु अनुष्का पाटोळे सह-ावीत शिक्षण घेणाऱ्या मातंग समाजातील विद्यार्थ्यीनीचा पलंगावर बसलेल्या स्थितीत फाशी घेतलेल्या संशयास्पद अवस्थेत मृतदेह आढळुन आला होता.


परंतु अनुष्काच्या कुटुंबीयांनी आरोप केलेला आहे की अनुष्काने आत्महत्या केलेली नसून तिची नवोदय विद्यालय प्रशासनातील लोकांनीच हत्या केलेली आहे.

सदरील घटनेला आठवडा उलटुनही स्थानिक पोलीस प्रशासन आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप पिडीत कुटुंबीयांनी तसेच मातंग समाजाच्या विविध संघटनेच्या वतीने करण्यात येत असून त्याचे पडसाद संपुर्ण महाराष्ट्र राज्यात उमटत आहे परंतु महाराष्ट्र सरकारने या घटनेबद्दल अद्याप आपली कुठलीही भुमिका जाहीर केलेली नाही.

सदरील घटनेच्या अनुषंगाने लहुजी क्रांती सेना सिल्लोड तालुका तसेच सकल मातंग समाजाच्या वतीने रविवार रोजी सिल्लोड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते .अनुष्काच्या मारेकऱ्यांवर कठोर शासन करण्यात यावे तसेच सदरील घटनेतील आरोपिंना पाठिशी घालणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना सहआरोपी करुन सेवेतुन बडतर्फ करण्यात यावे यासह विविध मागण्यांसंदर्भात लहुजी क्रांती सेना सिल्लोड तालुका तसेच सकल मातंग समाजाच्या वतीने दि १३ जानेवारी रोजी महाराष्ट्र सरकार तसेच लातुर येथील स्थानिक प्रशासनाच्या विरोधात जाहीर निषेध मोर्चा तसेच मुंडण आंदोलनाचे नियोजन लहुजी क्रांती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे, संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष सखाराम आहीरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.

सदरील मोर्चा सिल्लोड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसिल कार्यालयापर्यंत निघणार आहे सदरील मोर्चासाठी लहुजी क्रांती सेनेचे पदाधिकारी तसेच सकल मातंग समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब गायकवाड तसेच तालुका अध्यक्ष संजय कांबळे यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.


सदरील बैठकसाठी सामाजिक कार्यकर्ते काशीनाथ शिंदे, साहेबराव दनके, त्र्यंबक शेजुळ, विष्णु सोनवणे, फकिरचंद तांबे, बाबुराव अहिरे, भगवान सोनवणे, महेंद्र आहीरे, दिपक दणके, कैलास भाले, विठ्ठल कांबळे, विष्णू साळवे, मनोज अहिरे, गणेश शिंदे, अमोल खेत्रे, समाधान लोखंडे, सुभाष कांबळे , विशाल, आहिरे, कृष्णा दनके, साहेबराव आहीरे, अमोल काकफळे, दनके, जनार्धन दनके, एकनाथ आघाम, रवी कांबळे, दादाराव सिरसाठ आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त

### सामाजिक न्याय मंत्री तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची उपस्थिती



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** विद्यार्थी व शिक्षकांच्या शैक्षणिक व सामाजिक हितासाठी कार्यरत असलेल्या 'हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन' च्या वतीने सन २०२६ या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे (कॅलेंडर) प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची उपस्थिती होती. प्रकाशन प्रसंगी त्यांनी फाउंडेशनच्या उपक्रमांविषयी माहिती जाणून घेतली.

या सोहळ्याला हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर, भाजपाचे युवा नेते सुमित खांबेकर, जरा फाउंडेशनचे अध्यक्ष जावीद पटेल तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी फाउंडेशन तर्फे परंपरेनुसार पुष्पगुच्छ न देता पुस्तक व शाल देऊन पालकमंत्री यांचा सत्कार करण्यात आला.

हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनने आजवर विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून संस्थेचे कार्य सुरू आहे. या दिनदर्शिकेमुळे नागरिकांना संस्थेच्या कार्याची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

बदलत्या काळात समाजसेवा अधिक प्रभावीपणे करण्यासाठी संस्था कार्यरत आहे व सदैव राहील.

### राजमाता जिजाऊ यांची ४२७ वी जयंती भांडुप धम्म उपासिका संघ यांनी भांडुप येथे साजरी केली



**आत्ताच एक्सप्रेस**

**भांडुप/ प्रतिनिधी/** राजमाता जिजाबाई शहाजी भोसले १२ जानेवारी १५९८ ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या.त्यांना राजमाता,राष्ट्रमाता, जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जाते. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाबाईंचे वडील व आईचे नाव म्हाळसाबाई होते. जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते.जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या.

भारत सरकारने ७ जुलै १९९९ रोजी जिजाबाईंच्या सन्मानार्थ डाक तिकीट प्रकाशित केले.जिजाबाई या अनेक चित्रपट आणि पुस्तकांच्या प्रेरणा आहेत.जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे म्हाळसाबाई आणि लखुजी जाधव यांच्या पोटी झाला. लखोजीराजे जाधव हे मराठा कुलीन होते. जिजाबाईंचा विवाह लहान वयातच वेरूळ गावातील मालोजी भोसले यांचा मुलगा शहाजी भोसले यांच्याशी झाला. त्यांनी शिवरायांना स्वराज्याची शिकवण दिली आणि एक महान योद्धा म्हणून उभे केले.म्हणूनच जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उद्धार करी अशी म्हण प्रसिद्ध आहे. हा आदर्श प्रत्येक महिलानी डोळ्यासमोर ठेऊन मुलावर संस्कार केले पाहजे . त्यातूनच छत्रपती शिवाजी महाराज निर्माण होतील. त्याकरिता महिलांनी राजमाता जिजाऊ यांची जयंती स्मृती दिन साजरा केला पाहिजे.असा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन भांडुप धम्म उपासिका संघ सर्व महापुरुष,महामाता,संताचा जयंती स्मृती दिन साजरा करीत असतात.यात धम्म उपासिका सुनिता उदेभान तायडे,तुळजाबाई गोविंद इंगळे,ज्योती दिलीप थाटे,कोकिळा महादेव बांगर,चंद्रकला सागर तायडे,सुषमा संजय वाकोडे ह्या विविध प्रेरणादायी लक्षवेधी पोस्टर तयार करून जयंती साजरी करत असतात.

## ऐतिहासिक जागेचा मुद्दा राज्य-देशपातळीवर नेण्याचा निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**रत्नागिरी/ प्रतिनिधी/** थिबा राजांच्या ऐतिहासिक वारशाचे संरक्षण आणि संबंधित जागा वाचविण्यासाठी भंते दीपंकर सुमेधो यांनी पुढाकार घेतला असून या संदर्भात थिबा राजा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ९ जानेवारी रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पार पडली.थिबा राजांची जागा हा केवळ रत्नागिरीपुरता मर्यादित प्रश्न नसून तो महाराष्ट्रासह देशपातळीवरील ऐतिहासिक व सांस्कृतिक मुद्दा असल्याचे मत या बैठकीत मांडण्यात आले.

या बैठकीदरम्यान संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भंते दीपंकर सुमेधो यांना संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती दिली. त्यावर प्रतिक्रिया देताना भंते सुमेधो यांनी हा लढा राज्यस्तरासह देशपातळीवर उभा करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. थिबा राजा (थिबा मिन) हा म्यानमार (ब्रह्मदेश) चा शेवटचा राजा होता,ज्याला ब्रिटीशांनी १८८५ मध्ये पदच्युत करून रत्नागिरी,भारतात स्थानबद्ध केले आणि १९१६ मध्ये त्याचा मृत्यू होईपर्यंत तो येथेच होता;त्यामुळे त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही रत्नागिरीची भूमी ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.थिबा राजांचा हा अमूल्य ऐतिहासिक ठेवा जतन करण्याची जबाबदारी सर्वप्रथम बौद्ध



**थिबा राजा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत भंते दीपंकर सुमेधो यांची महत्त्वपूर्ण बैठक**

समाजाची असल्याचे स्पष्ट करताना, साडेसतरा गुंठ्यांच्या आरक्षणाची मागणी पूर्ववत करण्यात यावी,अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. त्याचबरोबर संबंधित सहा एकर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही असा थेट इशाराही देण्यात आला.

थिबा राजा यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त रत्नागिरी येथील थिबा पॅलेस येथे आयोजित कार्यक्रमाची आठवण करून देण्यात आली,भंते दीपंकर सुमेधो यांनी त्यावेळी म्यानमारमधून तब्बल ८५ मान्यवरांना रत्नागिरीत आणण्यासाठी पुढाकार घेतला होता.या कार्यक्रमाला थिबा राजांचे वंशज, म्यानमारचे उपराष्ट्रपती,लष्करप्रमुख तसेच म्यानमार देशाचे भंतेगण उपस्थित होते.या यशस्वी आंतरराष्ट्रीय कार्यक्रमामुळे रत्नागिरीचे नाव जागतिक पातळीवर पोहोचल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या बैठकीला भंते दीपंकर सुमेधो यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार धम्म प्रचारक अभ्यासक सागर तायडे, धम्म उपासक चंद्रकांत गमरे,थिबा राजा संघर्ष समितीचे अध्यक्ष एल.व्ही.पवार,कार्याध्यक्ष अनंत सावंत,सचिव अमोल जाधव, शिवराम कदम,आंबुलकर,प्रकाश पवार (पावस), देवेन कांबळे, किशोर पवार, केतन पवार, राजेंद्र कांबळे, रत्नदीप कांबळे,रूपेश कांबळे आदी समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## भ्रष्टाचारमुक्त पालिकांसाठी जागरूक मतदारांची भूमिका महत्त्वाची : हेमंत पाटील

### जातपात, आमिषांना बळी न पडता मतदान करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ प्रतिनिधी/** भ्रष्टाचाराविरोधात लढणाऱ्या, भ्रष्टाचाराला खतपाणी न घालणाऱ्या उमेदवारांनाच नागरिकांनी निवडून दिले पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त महानगरपालिका व पारदर्शक प्रशासनासाठी जागरूक आणि भ्रष्टाचारविरोधी नागरी भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी मंगळवारी (ता.१३) केले. जातपात, आमिषांना बळी न पडता प्रत्येकाने येत्या १५ जानेवारीला होवू घातलेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले आहे.

या निवडणुकीच्या माध्यमातून मतदारांना योग्य उमेदवार निवडून देऊन शहराच्या विकासाला दिशा देण्याचा अधिकार मतदानातून मिळतोय. त्यामुळे हे अमूल्य मत विकासाभिमुख, प्रामाणिक आणि जनतेसाठी काम करणाऱ्या उत्तम उमेदवारांनाच द्यावे. प्रभागातील स्वच्छता, आरोग्य यंत्रणा, शिक्षण तसेच पाणीपुरवठ्यासह स्थानिक मुद्द्ये लक्षात घेवून मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

निवडणुकीच्या शेवटच्या दोन दिवसांत मतदारांना प्रलोभने देण्याचे प्रकार वाढतात. पैसे वाटप, वस्तूंचे आमिष दाखवणे अशा गैरप्रकारांना नागरिकांनी बळी पडू नये. मतदार हा लोकशाहीचा कणा असून त्याने सजग व जबाबदार भूमिका घेतली पाहिजे. तात्पुरत्या लाभासाठी मत विकणे म्हणजे आपल्या शहराच्या भविष्यास धोका निर्माण करणे होय, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि जनहिताभिमुख करण्यासाठी स्वच्छ प्रतिमेचे, भ्रष्टाचारमुक्त नेतृत्व निवडून देणे गरजेचे आहे. प्रत्येक मतदाराने आपले मत योग्य ठिकाणी वापरून लोकशाही मजबूत करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही हेमंत पाटील यांनी यावेळी केले.

महापालिका निवडणुकीचा रणसंग्राम

# प्रभाग १० मध्ये 'आप'चा झंझावात, प्रस्थापित पक्षांची झोप उडाली!

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १० 'ब' आणि १० 'क' मध्ये राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलताना दिसत आहेत. आम आदमी पार्टी (AAP) कडून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सौ. उज्वला सुग्रीव मुंढे आणि वैजनाथ राठोड यांच्या झंझावाती प्रचाराने प्रस्थापित पक्षांचे धाबे दणाणले असून, प्रभागातील जनतेचा 'झाडू'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

प्रस्थापितांच्या 'आश्वासनांची खैरात' विरुद्ध 'कामाचे राजकारण'

गेल्या अनेक दशकांपासून भाजप आणि शिवसेना (ठाकरे गट) यांनी महापालिकेवर सत्ता भोगली, मात्र शहरवासीयांचे मूलभूत प्रश्न आजही 'जैसे थे'च आहेत. यावर हल्लाबोल करताना 'आप' उमेदवारांनी थेट जनतेच्या जखमेवर बोट ठेवले आहे:

**पाणीटंचाईचा शाप:** वर्षाला फक्त ४२ वेळा पाणी आणि पाणीपट्टी मात्र ३६५ दिवसांची, हा लूटमार करण्याचा प्रकार थांबणार कधी?

**टँकर माफियांचे साम्राज्य:** १५ लाख लोकसंख्येच्या शहराला आजही नळाने पाणी का मिळू शकत नाही? शहराला टँकरमुक्त करण्याचे आश्वासन हवेतच विरले.

**भ्रष्टाचाराचा कळस:** गरिबांच्या घरकुल योजनेत भ्रष्टाचार झाला, मात्र हक्काची घरे मिळाली नाहीत.

**नागरी सुविधांचा अभाव:** सिडको-म्हाडाचे मालकी हक्क, गुंठेवारीचा प्रलंबित प्रश्न, तुंबलेल्या ड्रेनेज लाईन आणि सार्वजनिक शौचालयांची वानवा यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

निवडणूक आली की पक्ष बदलायचा आणि सत्तेत आले की जनतेला विसरायचे, ही प्रवृत्ती आता चालणार नाही. जनता आता कामाला मत देणार! अशा भावना प्रभागातील नागरिक व्यक्त करत आहेत.

**बदलाचे नेतृत्व: सौ. मुंढे आणि वैजनाथ राठोड**



अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली मॉडेलच्या प्रेरणेने आणि सुग्रीव मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हे दोन्ही उमेदवार घराघरांत जाऊन संवाद साधत आहेत. सौ. उज्वला मुंढे यांनी महिलांची सुरक्षा, प्रभागातील स्वच्छता आणि सक्षमीकरणावर विशेष भर दिला आहे.वैजनाथ राठोड यांनी तरुणांसाठी रोजगाराच्या संधी आणि प्रभागाचा सर्वांगीण विकास ही आपली प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले आहे.

**पक्षांतराला कंटाळलेली जनता 'आप'कडे आशेने**

प्रस्थापितांच्या पक्षांतराच्या खेळाला वैतागलेला सामान्य मतदार आता एक सक्षम पर्याय म्हणून आम आदमी पार्टीकडे पाहत आहे.

बदल हवा, पक्षांतराला नाही, कामाला मत या घोषणांनी प्रभाग १० दुमदुमून गेला आहे. सुग्रीव मुंढे यांच्या नेतृत्वाखालील ही 'बदलाची लाट' महापालिकेच्या निकालात मोठे फेरबदल घडवून आणण्याची चिन्हे दिसत आहेत.

## आरक्षण मर्यादेचे उल्लंघन; जालना जिल्हा परिषद निवडणूक लांबणीवर

जालना: राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या कार्यक्रमातून जालना जिल्ह्याला वगळण्यात आल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. जालना आणि भोकरदन या दोन पंचायत समित्यांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. मात्र, या दोन तालुक्यांत हे प्रमाण अधिक झाल्याने तांत्रिक पेच निर्माण झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून निवडणूक आयोगाने संपूर्ण जालना जिल्हा परिषदेची निवडणूक प्रक्रिया सध्या स्थगित ठेवली आहे. यामुळे निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेले उमेदवार आणि राजकीय पक्षांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.राजकीय नेत्यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त करत आरक्षण पुनर्रचना करून त्वरित निवडणुका घेण्याची मागणी केली आहे.

## संक्षिप्त

## राजमाता जिजाऊ माँसाहेब व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** दि.१२ जानेवारी २०२६ रोजी अंबड शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष अंबड पत्रकार संघाचे अध्यक्ष मा. श्री सुरेश शेठ भावले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अंबड वार्ता चे संपादक तसेच जिल्हा अध्यक्ष तैलिक महासभा चे मा.श्री बळीराम भाऊ राऊत,दैनिक अत्ताच एक्सप्रेस जालना जिल्हा प्रतिनिधी मा.श्री गणेश सपकाळ सर,दैनिक समर्थ राजयोग जालना जिल्हा प्रतिनिधी मा.श्री फारूक शेख,भारतीय लोकशाही न्यूज कार्यकारी संपादक मा.श्री आकाश जळके तसेच गुरुकुल चे संचालक मा.श्री संजय जाधव सर होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिक्षक योगेश हरणे सरांनी केले. विद्यार्थी प्रशांत वाघ याने राजमाता जिजाऊ माँसाहेबचे जिवन चरित्र सांगितले.तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त शाळेत सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते.त्यासाठी अंबड वार्ता चे संपादक मा.श्री बळीराम राऊत यांनी परिक्षे मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिस देण्याचे जाहीर केले.शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री संजय जाधव सर यांनी केले. यावेळी श्री प्रमोद मस्के सर,श्री योगेश हरणे सर,सौ.शितल जाधव मॅडम,सौ.योगिता शिंदे मॅडम,पालक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


## आ.राजेश टोपे यांच्या हस्ते रंगनाथ पठारे यांच्या साहित्यावरील दोन समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. राजेश टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.पंडित रानमाळ लिखित रंगनाथ पठारे यांची कादंबरी : स्वरूप व विश्लेषण,रंगनाथ पठारे यांची कादंबरी : दृष्टिकोन आणि भाषाशैली या दोन समीक्षाग्रंथाचे प्रकाशन मा.आ.राजेश टोपे व शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. मनिषाताई टोपे आणि प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. बी.आर. गायकवाड यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

रंगनाथ पठारे हे मराठी साहित्य अकादमीप्राप्त व प्रतिभावंत कादंबरीकार असून या पुस्तकांमध्ये पठारेंच्या कादंबरीतील अशयात्मकता व भाषाशैली यांचा समीक्षात्मक वेध घेतला आहे. त्याच्या कादंबऱ्या समाजमूल्याचे भान असणाऱ्या, वास्तवाला भिडणाऱ्या आहेत.त्यातून माणसाच्या जगण्यातील वास्तवता ते प्रखरपणे मांडतात.या दोन्ही ग्रंथाचे प्रकाशन श्रीमती रूपाली अवचारे यांच्या यशोदीप पब्लिकेशन,पुणे यांनी केले आहे.

या प्रकाशन सोहळ्यास सहप्रशासकीय अधिकारी श्री.राहुल भालेकर,डॉ.शंकर तिकांडे,डॉ.राम काकडे,डॉ.निखिल गायकवाड,डॉ.रामेश्वर काळे,श्री.आप्पासाहेब नाटकर,श्री. दिलीप मुळे,श्री.जगवाल,श्री.घोगरे तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.हे पुस्तक संशोधकांसाठी तसेच वाचकांसाठी उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.




## कन्नड नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या रंजनाताई राठोड यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड: (प्रतिनिधी, उदय कुलकर्णी)** कन्नड नगरपरिषदेच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. बंजारा समाजाच्या उदयोन्मुख समाजसेविका आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भरघोस मताधिक्याने निवडून आलेल्या सौ. रंजनाताई रवींद्र राठोड यांची नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.



नुकत्याच पार पडलेल्या कन्नड नगरपरिषद निवडणुकीत सौ. रंजनाताई राठोड यांनी राष्ट्रवादी पक्षाकडून निवडणूक लढवली होती. त्यांच्या जनसंपर्कामुळे आणि कामाच्या जोरावर मतदारांनी त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी केले. त्यांचे पक्षाप्रती असलेले निष्ठावान कार्य आणि समाजातील त्यांचे योगदान लक्षात घेता, पक्षाने त्यांच्यावर उपनगराध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे.

आज दि. १३ रोजी शहरातील पिशोर नाका परिसरात या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या अतिषबाजीत मोठा जल्लोष केला. रंजनाताईंच्या निवडीने बंजारा समाजात तसेच संपूर्ण शहरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या निवड सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे तालुक्यातील सर्वेसर्वा, नगरपरिषदेचे माजी गटनेते तथा नवनियुक्त स्वीकृत नगरसेवक श्री. संतोष कोल्हे आणि माजी नगराध्यक्षा सौ. स्वातीताई कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच नवनियुक्त नगरसेवक आणि पक्षाचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.रंजनाताई राठोड यांच्या निवडीमुळे नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या विकासकामांना अधिक गती मिळेल आणि सर्वसामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जातील, असा विश्वास यावेळी पक्षाच्या नेत्यांकडून व्यक्त करण्यात आला.सौ. रंजनाताई राठोड यांच्या या निवडीबद्दल शहरातून आणि राजकीय वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रुई येथे राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)**
अंबड तालुक्यातील रुई येथे राजमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा व बसस्थानक परिसरात प्रतिमा पूजन करून मासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी वक्त्यांनी जिजाऊंच्या संस्कारांतूनच स्वराज्य घडल्याचे सांगत त्यांच्या आदर्शाचे महत्त्व पटवून दिले. शालेय विद्यार्थ्यांनी भाषणे व गीतांतून जिजाऊंना मानवंदना दिली. या कार्यक्रमामुळे गावात उत्साहाचे व देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## संतोष कोल्हे यांची 'स्वीकृत नगरसेवक' पदी निवड; कन्नडमध्ये जल्लोषात स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड: (प्रतिनिधी, उदय कुलकर्णी)**
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे तालुका सर्वेसर्वा संतोष कोल्हे यांची कन्नड नगरपालिकेत 'स्वीकृत नगरसेवक' म्हणून अधिकृत निवड करण्यात आली आहे. कोल्हे यांच्या निवडीने शहरासह तालुक्यात राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण पसरले असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



भव्य मिरवणूक आणि जल्लोष संतोष कोल्हे यांची निवड जाहीर होताच, दि. १३ रोजी कन्नड शहरातील पिशोर नाका परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनियुक्त नगरसेवक आणि पदाधिकारी यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात, गुलालाची उधळण करत आणि जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करत परिसर दणाणून सोडला होता. आपल्या लाडक्या नेत्याची वर्णी लागल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

पक्ष संघटनेत महत्त्वाचे स्थान संतोष कोल्हे हे कन्नड तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) एक निष्ठावान आणि प्रभावशाली नेतृत्व म्हणून ओळखले जातात. पक्षाने त्यांच्या कामाची दखल घेत त्यांना नगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिली आहे. या निवडीमुळे आता शहराच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.या निवडीबद्दल संतोष कोल्हे यांचे सर्वच स्तरांतून कौतुक होत असून, आगामी काळात शहराच्या प्रगतीसाठी ते महत्त्वाची भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्वागत सोहळ्याला पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813